राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर येथून श्रीमती उ.र.नगरकर, लिपिक-टंकलेखक यांच्या सेवा मंत्रालयीन विभागात प्रत्यावर्तीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः एएससी १५१०/प्र.क्र.२१७/एल.बी./१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०८ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा</u> :- १) सा.प्र.वि., क्र.एएससी १५१०/प्र.क्र.२१७/१०/१४-अ, दिनांक २०-०१-२०१४ चे आदेश
२) सा.प्र.वि., क्र.एएससी १५१०/प्र.क्र.२१७/१०/१४-अ, दिनांक २९-०८-२०१८ चे आदेश
३) श्रीमती उ.र.नगरकर यांवे दिनांक १०-०६-२०१९ चे निवेदन

<u>शासन आदेश</u>

संदर्भाधिन क्र.१ येथील आदेशान्वये श्रीमती उ.र.नगरकर, लिपिक-टंकलेखक, कृषि व पदुम विभाग यांची, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ यांच्या कार्यालयात ४ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने सेवा उपलब्ध करुन देण्यात आले होती. श्रीमती नगरकर या दिनांक १७-०६-२०१४ पासून राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ येथे कार्यरत आहेत. श्रीमती नगरकर यांचा चार वर्षाचा प्रतिनियुक्ती कालावधी पूर्ण झाल्यामुळे संदर्भाधिन क्र.२ येथील आदेशान्वये श्रीमती नगरकर यांच्या प्रतिनियुक्तीस दिनांक १६-०६-२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. श्रीमती नगरकर यांनी संदर्भाधिन क्र. ३ येथील निवेदनान्वये त्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्याची विनंती केली होती.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दिनांक १७.१२.२०१६ अन्वये प्रतिनियुक्तीचे धोरण निश्चित करण्यात आले असून, या शासन निर्णयास शा.नि. क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या-१२, दिनांक १६-०२-२०१८ अन्वये दि.१७-१२-२०१६ च्या शासन निर्णयातील परि.५ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली आहे:-

क) परि.क्र ५(अ) (३) पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.:-

परि.क्र. ५(अ) (३): ५ वर्षाचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३. वर परिच्छेद २ मधील शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेता श्रीमती उ.र. नगरकर, लिपिक-टंकलेखक यांचा राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ कार्यालयातील प्रतिनियुक्तीचा कालावधी या आदेशान्वये संपुष्टात आणून त्यांची सेवा प्रत्यावर्तीत करण्यात येत असून, सेवा प्रत्यावर्तीत केल्यानंतर त्यांची खालील **रकाना ६ मधील** मंत्रालयीन विभागात पदस्थापना करण्यात येत आहे.

अ. क्र.	लिपिक-टंकलेखकाचे नांव	मूळ विभाग	सध्याचे प्रतिनियुक्तीचे ठिकाण	प्रतिनियुक्तीचा दिनांक	सेवा प्रत्यावर्तित केल्यानंतर पदस्थापनेचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
१	२	३	४	५	६
१.	श्रीमती उ.र.नगरकर	कृषि व पदुम विभाग	राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर	१७-०६-२०१४	विधि व न्याय विभाग

४. संबंधित राज्य माहिती आयोगाचे लक्ष सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक १७-१२-२०१६ व दिनांक १६-०२-२०१८ मधील तरतूदीकडे वेधण्यात येत असून उपरोक्त कर्मचाऱ्यास एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी अन्य कोणत्याही आदेशाची वाट न पाहता पदस्थापना केलेल्या विभागात तत्काळ रुजू व्हावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०८१६१३१९४५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.08 16:18:20 +05'30'

(ग. भि. गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्रीमती उ.र.नगरकर, लिपिक-टंकलेखक, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, नागपूर

प्रत:

१. सचिव, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०००३२

त्यांना विनंती करण्यात येते की, सेवा प्रत्यावर्तीत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याच्या जागी रिक्त पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत आपण उप सचिव (का.क्र.६), सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा करावा.

२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ, प्रशासकीय इमारत क्र.२, सिव्हिल लाईन्स, नागपूर.

३. सह/उप सचिव (आस्थापना), विधि व न्याय विभाग/कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

४. उप सचिव (का.क्र.६), सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयसमोर, मुंबई ४०० ०३२. त्यांना विनंती करण्यात येते की, सेवा प्रत्यावर्तीत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याच्या जागी रिक्त झालेले पद प्रतिनियुक्तने भरण्याबाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

५. साप्रवि/१४-अ (संग्रहार्थ).